**Punya Nagari, Nagpur, Sep 04 2012**

# सेंटर पॉइंट शाळा विजेती ठरली

नागपूर – टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएसतर्फे डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित आंतरशालेय आयटी प्रश्नमंजूषा स्पर्धेत सेंटर पॉइंट स्कूलचा पारितोष कान्हे आणि अनिरुद्ध मोरारका यांनी बाजी मारली. या स्पर्धेत नागपुरातील १४०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. उपविजेते म्हणून डीपीएस शाळेचे अभिषेक अंबूलकर आणि अबू बक्र सी यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. पुरस्काराचे वितरण व्हीएनआयटीचे अधिष्ठाता डॉ. आर. के. इंगळे आणि टीसीएसचे उपाध्यक्ष आणि केंद्रप्रमुख चैतन्य साठे यांच्या हस्ते पार पडले.